# जॅक मा



जॅक मा: एक गरीब शिक्षक ते 3000 करोडचा मालक...
चीनमधील ‘अलीबाबा ग्रुप’ हा जगातील सर्वात यशस्वी इंटरनेट-आधारीत व्यवसायांपैकी एक आहे. जॅक मा हा त्याचा फाऊंडर आणि चेअरमन. ‘फोर्ब्स’सारख्या जगप्रसिद्ध मॅगझीनच्या कव्हरपेजवर झळकणारा तो पहिला चायनीस बिझनेसमॅन. जगभरातील श्रीमंतांचा यादीत 18 वा आणि चीनमधील सर्वात श्रीमंत माणुस अशी त्याची ओळख आहे.

जॅक मा चा जन्म 1964 मध्ये चीनचा झेझिएंग भागातील हॅंगझाऊ येथे झाला होता. त्याचे आईवडील हे तेथील पांरपारिक गीत-कथाकार होते. लहानपणापासुनच सर्वसामान्याप्रमाणे असणारा जॅक आपली इंग्लिश शिकण्याची इच्छा पुर्ण करण्यासाठी आपल्या बाईकने शहरातील मुख्य हॉटेलमध्ये जाऊन तेथील परदेशी लोकांशी संवाद साधत असे. स्वत:च्या इंग्लिशमध्ये सुधारणा करण्यासाठी तो त्यांचा गाईड बनुन त्यांना शहरातुन मोफत फिरवीत असे.

शाळेपर्यंतचे शिक्षण कसेबसे घेतल्यावर जॅक कॉलेज प्रवेशासाठी प्रयत्न करु लागला. कॉलेजची प्रवेशपरीक्षा दोनवेळा नापास झाल्यावर तिसऱ्या प्रयत्नात अखेर तो पास झाला आणि त्याला हॅंगझाऊ टिचर इंस्टिस्ट्युटमध्ये एडमिशन मिळाले. जॅक 1988 मध्ये पदवीधर झाला आणि त्याने नोकरी शोधण्यास प्रारंभ केला.

अनेक ठिकाणी नोकरीसाठी अर्ज देऊनही जॅकचा पदरी निराशा पडत होती. शेवटी एके ठिकाणी त्याला इंग्लिश टीचरची नोकरी मिळाली. महिन्याला फक्त 12$ ची कमाई देणाऱ्या त्या नोकरीतही जॅक आनंदी व समाधानी होता.

नोकरी चालत होती, दरम्यान जॅकने एक ट्रांसलेशन कंपनी चालु केली होती. त्यानिमित्तानेच त्याला 1995 मध्ये अमेरिकेत जायची संधी मिळाली. जेथे एका मित्राने त्याला पहिल्यांदा इंटरनेटची ओळख करवुन दिली.

'इंटरनेटवर सर्वकाही माहिती असते' असे जॅकला सांगण्यात आले. जॅकला इंटरनेटची भुरळ पडली, त्याने लागलीच चायनीज व्यवसायांबद्दल सर्च केले पण त्याला एकही चायनीज रिझल्ट मिळाला नाही.

काही दिवसांनी जॅक घरी परतला. एप्रिल 1995 मध्ये जॅक, त्याची पत्नी आणि त्यांचा एक मित्र, अशा तिघांनी जमा केलेल्या पैशांनी चीनमधील पहिली इंटरनेट कंपनी चालु करण्याचे ठरविले. त्यांनी त्या कंपनीचे नाव "चायना येलोव पेजेस" असे ठेवले. ज्यात परदेशी व्यापार वाढविण्यास इच्छुक असलेल्या चायनीज कंपन्याबद्दल माहिती होती

"चायना येलोव पेजेस" ची कल्पना पुर्णपणे फ्लॉप झाली. त्याचा चार वर्षांनंतर 1999 मध्ये जॅकने आपल्या 17 मित्रांच्या मदतीने पुन्हा एकदा प्रयत्न करण्याचे ठरविले आणि यावेळेस त्याने काही मोठे करायचे ठरविले होते. त्याला इंटरनेटवर एक मार्केट उभे करावयाचे होते, ज्यात कंपन्यांना आपली प्रोडक्टस लिस्ट टाकतानाच ग्राहकाला ऑनलाईन खरेदीचीही मुभा देण्यात येणार होती. अश्यातऱ्हेने लोकल कंपन्याही ग्लोबल होणार होत्या. त्याने त्याचा ह्या कंपनीचे नाव ठेवले होते, "अलीबाबा".

लवकरच, 'अलीबाबा.कॉम' ने जगभरातील कंपन्यांना आकर्षित करण्यास सुरुवात केली.. ऑक्टोबर 1999 पर्यंत कंपनीमध्ये 'गोल्डमन सॅक्स'ने 50 लाखांची आणि 'सॉफ्टबँक' नावाच्या एका जापानिस टेलिकॉम कंपनीने 2 करोडची गुंतवणुक केली.

2005 मध्ये 'याहु'ने अलीबाबा कंपनीच्या 40% शेअर्सच्या बदल्यात 100 करोडची गुंतवणुक केली. त्यावेळेस सामाईक बिझनेस असणाऱ्या आणि चीनमध्ये हातपाय पसरणाऱ्या 'इबे' नावाच्या विदेशी कंपनीशी स्पर्धा करणाऱ्या 'अलीबाबा'साठी ही गुंतवणुक स्पर्धा जिंकविणारी ठरली.

2013 मध्ये जॅकने कंपनीचा सीईओ पदावरुन पायउतार केला तरीही आता तो कंपनीचा चेअरमन म्हणुन कारभार पाहतो. अलीबाबा ग्रुपचे नऊ शाखांत विभाजन होते- अलीबाबा.कॉम, ताओबाओ मार्केटप्लेस, टीमॉल, ईताओ, अलीबाबा क्लाऊड कॉम्प्युटींग, जुह्युआस्युऑन, 1688.कॉम, अलीएक्सप्रेस.कॉम आणि अलीपे.

आजच्या काळात जवळपास 24,000 करोडची किंमत असणाऱ्या अलीबाबा ग्रुपचा जॅक मा 7.8% शेअर्सचा मालक आहे शिवाय तो अलीबाबा ग्रुपमधील 'अलीपे' ह्या पेयमेंट प्रोसेसिंग सर्विसचाही 50% शेअर्सचा मालक आहे.

चीनमधील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि मुख्य म्हणजे रंकचा राजा झालेल्या यशस्वी बिझनेसमेन म्हणुन जॅकला नेहमीच जगभरातील प्रसिद्ध विद्यापीठांकडुन गेस्ट लेक्चर देण्यासाठी आमंत्रण दिले जाते.

‘अलीबाबा’च्या यशाचे रहस्य विचारले असता जॅक म्हणतो की, “माझ्या कंपनीच्या यशामागील एक रहस्य म्हणजे माझ्या कंपनीतील काम करणाऱ्या स्त्रियांचे जास्त असणारे प्रमाण. माझ्या कंपनीतील संपुर्ण कर्मचाऱ्यांपैकी 47% कर्मचारी ह्या स्त्रिया आहेत शिवाय कंपनीत वरच्या पदावर काम करणाऱ्यांत 33% प्रमाण स्त्रियांचे आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात स्त्रिया कामावर ठेवण्यामागचे कारण म्हणजे स्त्रिया नेहमी स्वत:पेक्षा दुसऱ्यांचा विचार अधिक करतात. हेच अलीबाबाचा आणि आमच्या युसर्ससाठी हिताचे ठरत आले आहे.”

2005 मध्ये ‘वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम’कडुन “यंग ग्लोबल लीडर” म्हणुन जॅकची निवड झाली.

2005 मध्ये जॅकचे नाव फोर्च्युनचा “25 मोस्ट पॉवरफुल बिझनेस पीपल इन एशिया” मध्ये आले.

जगप्रसिद्ध बिझनेसवीक मॅगझीनकडुन जॅकची “बिझनेसपर्सन ऑफ दी ईअर” म्हणुन निवड झाली.

2014 मध्ये फोर्ब्सकडुन प्रसिद्ध झालेल्या “मोस्ट पॉवरफुल पर्सन इन दी वर्ल्ड” च्या यादीत जॅकचा 30वा क्रमांक होता.

जॅक हा विवाहीत असुन तो आपली पत्नी, एक मुलगी व एक मुलासोबत राहतो.

भारतामधील आपली गुंतवणुक वाढविण्याचा उद्देशाने बोलताना जॅक म्हणतो की, “भारत एक महान देश आहे. भारतात खुप प्रतिभा आणि क्षमता आहे. आम्ही येत्या काही वर्षांत भारतातील गुंतवणुक वाढवु. नरेंद्र मोदी एक महान नेते आहेत.”